# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/07/2023 (शनिवार) सायंकाळ

---

### घरफोडी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील वार्ड क्र. २ वाघोडा झोपडपट्टी येथे दिनांक ३०/०६/२०२३ चे १६.३० वा. ते दिनांक २२/०७/२०२३ चे ११.२४ वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. रिना शंजु प्रजापती, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र. २ वाघोडा झोपडपट्टी ही घराला लॉक लावुन ग्वालीयर येथे शाळेत जॉब करते म्हणुन गेली होती तेव्हा ग्वालीयर येथे फिर्यादीचा मानलेला भाऊ यांनी फिर्यादीस फोन करून सांगीतले की तुझ्या घराचे लॉक तुटलेले असुन सामान अस्तव्यस्त आहे यावरून फिर्यादीने येवुन पाहले असता घराचे लॉक तुटलेले बाहेर पडलेले दिसले व स्वयंपाक खोलीत असलेले घरातील १) एक इंडियन कंपनीचे गॅस सिलेंडर व शेगडी किंमती अंदाजे ५०००/–रू. २) एक भारत कंपनीचा गॅस सिलेंडर व शेगडी किंमती अंदाजे ५०००/–रू. ३) एक लोखंडी स्टुल किंमती अंदाजे १०००/–रू ४) दोन स्टीलचे पिंप किंमती अंदाजे १०००/– रू. ५) दोन पितळी गुंड किंमती अंदाजे १२००/–रू असा एकुण १३२००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे समोरील कुलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील वरील प्रमाणे मुद्देमाल स्वत:चे आर्थीक फायदयासाठी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राजेश हावरे मो. नं. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

### फुस लावुन पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. मौदा : – दिनांक २६/०७/२०२३ चे ११.०० वा. ते ०७.३० वा. चे सुमारास फिर्यादीची पत्नी यांची प्रकृती खराब असल्याने त्यांचा उपचार मेडीकल कॉलेज नागपूर येथे सूरु असल्याने ते दोघेही नागपूर येथे राहतात व त्यांची मुलगी वय १६ वर्ष व मूलगा वय १० वर्ष दोन्ही मुलं आहेत. दि. २६.०७.२०२३ रोजी सायंकाळी ०७.३० वा. फिर्यादी यांचे घराशेजारी राहणारी त्यांनी फोन करुन सांगीतले की, तूमची मूलगी ही सकाळ पासून शाळेत गेली पण आता पर्यंत घरी परत आली नाही त्यावरुन यातील फिर्यादी यांनी दि. २७.०७.२०२३ रोजी सकाळी घरी येवून नातेवाईक गावामध्ये शाळेमध्ये आजूबाजूला शोध घेतला मूलगी मिळून आली नाही. मुलगी हिला दि. २६.०७.२०२३ चे सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ०७.३० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावून पळवून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राजेंद्र अडामे ब. नं १२८७ मो. क्र. ९६३७४००८७३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर